MHKO130001502021

नियमीत दिवाणी दावा क्र. १८७/२०१५ मधील
निशाणी क्र.७३ खालील आदेश .

**श्रीमती सविता अशोक ढवण व इतर**
**वि**
चंद्रकांत गुंडू ढवण व इतर

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक १९/१२/०२० रोजी वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी निशाणी ६४ वर झालेल्या आदेशाप्रमाणे निशाणी क्र.१ वर प्रतिवादी क्र.१ चे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी दुरुस्ती करुन प्रत देण्यासाठी परवानगी अर्ज दाखल केला आहे.

०२ प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज दाखल करण्यास उशीर झालेला आहे, त्यामुळे मे. कोर्टानी योग्य तो कायदेशीर आदेश करण्याची विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

०३. अर्ज व म्हणणे यांचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०४. अभिलेखाचे आवलोकन केले असता दिनांक १९/१२/२०२० रोजी वादीच्या निशाणी ६४ च्या अर्जाच्या आदेशानुसार मयत प्रतिवादी क्र. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी वादींना १४ दिवसांची मुदत देण्यात आली होती. त्यानंतर ०८/०१/२०२० तसेच ०५/०२/२०२०, २९/०२/२०२० अशी तारीख पडली आहे. ०८/०१/२०२० रोजी मयत प्रतिवादी नं. १ यांच्या वारसांना नोटीस पाठवण्यात आली असून २९/०२/२०२० रोजी मयत प्रतिवादी नं.१ चे वारस हजर झाले असून त्यांनी वकीलांमार्फत वकीलपत्र दाखल केले आहे. याअभिलेखावरुन

वादीने योग्य ते पावले उचलुन काम पुढे चालवले आहे. परंतु, निशाणी ६४ च्या आदेशानुसार दुरुस्ती करणेचे राहुन गेलेचे दिसून येत आहे. सदर विलंब हा जाणुनबुजून झालेला नसल्याची अभिलेखावरुन शक्यता वाटत आहे. मार्च-२०२० मध्ये कोरोनाच्या महामारीमुळे कोर्टाचे कामकाज लॉकडाऊनमध्ये बंद झालेले होते. त्यामुळे वादींना संधी मिळालेली नाही. त्यामुळे वादींना आता दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यास कोणतीही हरकत नाही. सबब, अर्ज मंजुर करण्यात येत आहे. पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे -

आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीने त्वरीत निशाणी क्र.१ वर दुरुस्ती करुन दावा दुरुस्तीप्रत अभिलेखावर ठेवण्यात यावी.

Vijaya Narayanrao Katkar

Digitally signed by Vijaya Narayanrao Katkar
Date: 2021.02.15 18:11:59 +0530

**ठिकाण – कागल**
**दिनांक १५/०२/२०२१**

**(काटकर विजया एन. एस.)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**कागल**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | :- | Sidram V. Kamble |
| Name of Court | :- | Katkar Vijaya N.S. Jt. Civil Judge (Jr.Dn.), Kagal. |
| Date of dictation/typed | :- | 15/02/2021 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 15/02/2021 |
| Judgment/order uploaded on | :- | 15/02/2021 |